# भुयारी मेट्रोही पूर्णत्त्वाच्या मार्गावर!

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** गेल्या कित्येक वर्षांपासून सातत्याने चर्चेत असणारी मुंबईची भुयारी मेट्रो वेगाने पुढे जात असून, कुलाबा - वांद्रे - सीप्झ या भुयारी मेट्रोचे मार्गदेखील जवळजवळ पूर्ण होत आले आहेत.

विशेष म्हणजे या मार्गावर धावणाऱ्या मेट्रोच्या डब्यांचे विशेष आकर्षण प्रवाशांना असून, स्टेनलेस स्टीलचे हे मेट्रोचे डबे किमान ३५ वर्षे टिकतील, असा दावा मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने केला आहे.

**३३.५ किमी**
मुंबई मेट्रो मार्ग ३ ची एकूण लांबी

## वीज वाचणार

ट्रेनच्या छतावर स्थित व्हेरिएबल व्होल्टेज व्हेरिएबल फ्रिक्वेन्सी प्रणालीद्वारे वातानुकूलित यंत्रणेचे नियंत्रण केल्याने ४ ते ५ टक्के ऊर्जा बचत होईल.

**२६** भुयारी **१** जमिनीवरील

स्थानके

- नरिमन पॉइंट
- वरळी
- वांद्रे - कुर्ला संकुल व आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय विमानतळ
- मरोळ औद्योगिक वसाहत
- सीप्झ

अशी महत्त्वाची केंद्रे मेट्रोने जोडली जातील.



**मुंबई मेट्रो लाईन 3 : कुलाबा - वांद्रे - सीप्झ**

- बीकेसी ते सीप्झ हा पहिला टप्पा जून २०२३ दरम्यान सुरु होणार आहे.
- मेट्रो ३ च्या पूर्णत्त्वानंतर १७ लाख प्रवासी प्रवास करु शकणार.
- रस्त्यावरील सुमारे सात लाख खासगी वाहनांची संख्या कमी होईल.

**५०** मिनिटांत कुलाबा ते आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रवास सहज शक्य होणार आहे.



**२४००** प्रवासी एका गाडीतून प्रवास करु शकतील.

**८५** किमी प्रतितास अशा वेगामुळे प्रवाशांचा वेळ वाचेल.

**३५ वर्षे** स्टेनलेस स्टीलच्या वापरामुळे मेट्रोचे डबे किमान ३५ वर्षे टिकू शकतील.

- डब्याच्या प्रत्येक बाजूला चार दरवाजे असतील.
- स्वयंचलित प्रकाश नियंत्रण असेल.
- मुंबई मेट्रो लाईन ३च्या ट्रेन ८ डब्यांच्या असतील.



**३०%** विद्युत उर्जेची बचत रिजनरेटिव्ह ब्रेकिंगमुळे होईल.



- ब्रेक ब्लॉक्स उपकरणांची झीज कमी होईल.